| Volume 02 | Issue 01 | June 2026 | ISSN: 3139-1737 |

International Journal of Advances and Applications in Convergent Studies & Transdisciplinary (IJ-AACST)

Bridging Disciplines, Bridging Knowledge

Website: https://aacstij.org | Email: journaleditor@aacstij.org

# "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रामटेक, काटोल, सावनेर, उमरेड आगारातील शासकीय महिला बस वाहकाच्या आर्थिक समस्याचे अध्ययन"

**प्रा.नीलम या.बारमासे[1]*, डॉ.रेकचंद गणपत गोंगले[2]**

[1]कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक नबिरा महाविद्यालय काटोल

nilambarmase09@gmail.com

[2]सहयोगी प्राध्यापक, नबिरा महाविद्यालय काटोल

## सारांश

"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रामटेक, काटोल, सावनेर, उमरेड आगारातील शासकीय महिला बस वाहकाच्या आर्थिक समस्याचे अध्ययन" या संशोधनाचा मुख्य उद्देश रामटेक, काटोल, सावनेर, उमरेड आगारातील शासकीय महिला वाहकाच्याआर्थिक समस्या, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यावर उपाययोजना यांचा अभ्यास करणे हा आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिला वाहकाची भूमिका महत्त्वाची असली तरी त्यांच्या आर्थिक परिस्थिती बाबत अधिक अडचणी आढळून येतात. रामटेक, काटोल, सावनेर, उमरेड, आगारातील महिला वाहकाचा नमुना निवडून त्यांच्या उत्पन्न, खर्च, कर्जबाजारीपणा, आर्थिक सुरक्षितता यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. संशोधनातून असे आढळले की शासकीय महिला वाहकाचे उत्पन्न मर्यादित असून वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर त्याचे कुटुंबीय खर्च भागविणे कठीण होते. अनेक महिला वाहकांना कर्जाचा आधार घ्यावा लागतो. अनियमित वेतन, अपुरे वेतन, आरोग्य खर्च यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत राहते. या समस्यांचे निराकरणासाठी नियमित व वेळेवर वेतन देणे, भत्त्यांमध्ये वाढ, आरोग्य विमा सुविधा सुधारणे, तसेच आर्थिक साक्षरता कार्यक्रम राबविणे या उपायोजना सुचविण्यात आल्या आहे.

## 1. प्रस्तावना

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महाराष्ट्र राज्याचे परिवहन महामंडळ प्रवाशांना सेवा पुरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात .गेल्या काही वर्षात महिला सक्षमीकरणाचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन विभागात महिला वाहकांची(Lady Conductor) संख्या लक्षणीय रित्या वाढली आहे. हे पदे स्वीकारल्यानंतर अनेक महिला मोठ्या आर्थिक आणि कार्यगत अडचणीचा सामना करावा लागत आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC)हे महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली कार्य करणारे एक महत्त्वाचे सार्वजनिक वाहतूक उपक्रम आहे याची स्थापना 1950 च्या रोड ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन कायद्यानुसार करण्यात आली असून राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी सुरक्षित आणि सुलभ प्रवासी सेवा पुरविणे याचा मुख्य उद्देश आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेले असून ग्रामीण व शहरी भागांना जोडण्यामध्ये याची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे "जिथे रस्ता तिथे एसटी" या ध्येय वाक्यानुसार दुर्गम भागापर्यंत पोहचवुन लोकांच्या दैनंदिन जीवनात वाहतुकीची

गरज पूर्ण केली जाते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सेवा विशिष्ट ग्रामीण भागातील लोकांसाठी जीवन वाहिनी ठरते. नागपूर विभागात नागपूर, काटोल, सावनेर, रामटेक उमरेड यासारखे प्रमुख डेपो कार्यरत आहे. त्यांच्या माध्यमातून दररोज शेकडो बस गाड्या विविध मार्गावर धावतात.

नागपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सेवा केवळ प्रवासी वाहतुकीपूरती मर्यादित नसून ग्रामीण भागातील लोकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि बाजारपेठांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. काही दुर्गम गावापर्यंत एसटी सेवा पोहोचल्याने स्थानिक नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाल्याचे दिसून येते. नागपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे ग्रामीण व शहरी भागांना जोडणारे एक महत्त्वाचे माध्यम असून आर्थिक विकासात त्याचा मोठा वाटा आहे.

ग्रामीण व शहरी भागांना जोडणाऱ्या या व्यवस्थेत शासकीय महिला वाहकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः नागपूर जिल्ह्यात काटोल, सावनेर, रामटेक, उमरेड आगारात शासकीय महिला वाहक कार्यरत असून विविध सामाजिक आर्थिक व कार्यस्थळी संबंधित आव्हानांना सामोरे जात आहे.

सध्याच्या काळात महिलांचे कार्यक्षेत्रात वाढते प्रमाण हे समाजातील प्रगतीचे लक्षण असले तरी त्यांना अजूनही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. एसटी महामंडळातील शासकीय महिला वाहकांनाअनियमित कामाचे तास सुरक्षिततेच्या समस्या, अपुरी सुविधा, वेतना संबंधी अडचणी तसेच सामाजिक दबाव अशा विविध समस्यांचा सामना करावा लागतो. या समस्या केवळ त्यांच्या कामगिरीवरच नव्हे तर त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावरही परिणाम करतात.

या संशोधनाचा मुख्य उद्देश शासकीय महिला वाहकांच्या आर्थिक समस्यांचा सखोल अभ्यास करून त्यांच्या अडचणीचे विश्लेषण करणे व त्यावर योग्य उपाय योजना सुचविणे हा आहे त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या कार्य स्थितीत सुधारणा होऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल.

---

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या 'महिला सन्मान योजने'अंतर्गत महिलांना हाफ तिकीट व ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास या योजनेमुळे महिला प्रवाशांची संख्या 65 टक्क्यापर्यंत वाढली आहे .तसेच ज्येष्ठ नागरिकांची सुद्धा एसटी महामंडळाच्या प्रवासा करीता संख्या वाढली आहे.त्याचा परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर पडत आहे त्यामुळे एस टी महामंडळ तोट्यात येत आहे.

## 2. संशोधनाची उद्दिष्टे

1. शासकीय महिला बसवाहकाच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे
2. शासकीय महिला बस वाहकाच्या कामाचे तासाचा अभ्यास करणे.

शासकीय महिला वाहकाच्या कामाच्या ठिकाणी येणाऱ्या शारीरिक समस्यांचा अभ्यास करणे.

3. शासकीय महिला वाहकांना कामाच्या ठिकाणी येणाऱ्या मानसिक समस्यांचा अभ्यास करणे.
4. शासकीय महिला वाहकांची घर आणि नोकरी यातील समतोल राखतांना होणारी कसरत समजून घेणे.
5. शासकीय महिला बस वाहकांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपायांचा अभ्यास करणे

**3. गृहीत कृत्ये**

1. शासकीय महिला बसवाहक प्राप्त होणाऱ्या वेतनात समाधानी नाही.
2. शासकीय महिला बस वाहकांना कर्तव्य बजावत असताना शारीरिक समस्या निर्माण झाल्या आहेत.
3. शासकीय महिला बस वाहकांनाअतिरिक्त कामाच्या ताणामुळे मानसिक त्रास झाला आहे.

**4. अभ्यास पद्धती**

संशोधकाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ काटोल, रामटेक ,सावनेर, उमरेड तालुक्यातील शासकीय महिला बस वाहकाच्याआर्थिक समस्यांचे अध्ययन हा विषय अध्ययन करण्यात आला असून माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे या विषयाच्या अभ्यासाकरीता काटोल, रामटेक, सावनेर, उमरेड तालुक्यातील शासकीय महिला बस वाहकाच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्रश्नावली भरून घेण्यात आल्या व त्यावरून विश्लेषण करण्यात आले.

**5. शासकीय महिला बस वाहकाच्या आर्थिक समस्या**

1) शासकीय महिला बस वाहकाच्या आर्थिक समस्या खालील प्रमाणे आहेत.
2) महामंडळाला तोटा: - महिलांना हाफ तिकीट व ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास या योजनेमुळे एसटी महामंडळ सतत तोट्यात जात आहे.
3) शासकीय महिला कंडक्टर ताण:- प्रवाशांची संख्या प्रचंड वाढल्यामुळे शासकीय महिला वाहकावर कामाचा ताण वाढला आहे काही प्रकरणांमध्ये गर्दीचा फायदा घेऊन रोख रक्कम चोरीला जाण्याचे प्रकार घडत आहे.
4) अनुदानावर अवलंबित्व:- मोफत प्रवासाचा खर्च भागविण्यासाठी महामंडळाला पूर्णपणे राज्य सरकारच्या अनुदानावर अवलंबून राहावे लागते.
5) अनियमित वेतन:- महामंडळाच्या आर्थिक संकटामुळे शासकीय महिला वाहकाचे वेतन अनेकदा वेळेवर होत नाही ज्यामुळे घर खर्च आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळणे कठीण होते.
6) कमी पगार:- वाढत्या महागाईच्या तुलनेत शासकीय महिला वाहकाचे पगार कमी आहे आणि महामंडळाला आर्थिक अडचणीमुळे वेतनवाढीतील अडथळे या समस्या भेडसावत आहे.
7) क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी:- महामंडळाच्या अनेक बसेस क्षमतेपेक्षा खूप जास्त म्हणजे शंभर ते दीडशे महिला प्रवाशांनी खचाखच भरलेले असल्याने शासकीय महिला वाहकावर प्रचंड ताण येतो.
8) वाहकांना दंड:- महामंडळाच्या बसेस क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेत असताना तपासणी दरम्यान आढळलेल्या किरकोळ चुकासाठी डेपो व्यवस्थापकाकडून शासकीय महिला वाहकांना दंड आकारला जातो किंवा निलंबित केले जाते.
9) आर्थिक ताण:- कर्मचाऱ्यांचे वेळेवर पगार करण्यासाठी महामंडळाला वेळेवर निधी उपलब्ध होत नाही तसेच काही योजनांची थकबाकी सुद्धा वेळेवर दिली जात नाही त्यामुळे शासकीय महिला वाहकांना आर्थिक टंचाईला सामोर जावे लागते.
10) वेतन विलंब आणि अनिश्चितता:- अनेकदा वाहकांचे पगार वेळेवर होत नाही महामंडळाकडे निधी अभावी वेतन रखडल्याच्या घटना सातत्याने घडतात.
11) मानसिक आणि शारीरिक ताण:- शासकीय महिला वाहकालाअतिरिक्त कामाच्या ताना मुळे शारीरिक आजार आणि मानसिक ताण वाढत आहे.
12) कौटुंबिक आर्थिक नियोजन कोलमडणे:- वेळेवर पगार न मिळाल्याने ,घरातील मुलांचे शिक्षण, आणि दैनंदिन घरखर्च भागवणे कठीण होते.
13) दैनिक खर्च :- शासकीय महिला बसवाहकांना कामावर येण्या जाण्यासाठी होणारा खर्च म्हणजेच ग्रामीण भागातून डेपोपर्यंत आणि राहणीमानाचा खर्च पगारामधून निभावणे कठीण होते.

14) अनिश्चित नोकरी:- काही महिला वाहक कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असल्याने नोकरीची अनिश्चितता आणि तुटपुंजे उत्पन्न ही मोठी समस्या आहे.

15) मूलभूत सुविधांचा अभाव:- बस डेपोमध्ये शासकीय महिला वाहकांसाठी स्वच्छ प्रसाधन गृहे आणि पिण्याच्या पाण्याचे अपुरी व्यवस्था असते त्यामुळे आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात.

**विश्लेषण**:-संशोधकाने रामटेक आगार काटोल आगार,सावनेर आगार, उमरेड आगारांना प्रत्यक्ष भेट देऊन शासकीय महिला वाहकाची संख्या घेतली आहे. या शासकीय महिला वाहकाच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्रश्नावली भरण्यात आल्या. त्यामध्ये त्यांना कामाचे तास ,मिळणारे वेतन, शारीरिक व मानसिक ताण, प्रवाशांचे गैरवर्तन, वायू व ध्वनी प्रदूषणामुळे होणारे शारीरिक आजार व मानसिक आजार यावर प्रत्यक्ष मुलाखती द्वारे प्रश्न विचारण्यात आले ते खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

| आगाराची नावे | कार्यरत शासकीय महिला वाहक | कामाचे तास | अपुरे वेतन | शारिरीक व मानसिक ताण | प्रवाशांचे गैरवर्तन | ध्वनी व वायू प्रदुषणामुळे होणारे शारिरीक आजार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | | प्रतिशत प्रमाण (%) | नाही | प्रतिशत प्रमाण (%) |
| रामटेक | 26 | 24 | | 92.30 | 02 | 7.69 |
| काटोल | 18 | 17 | | 94.44 | 01 | 5.55 |
| सावनेर | 15 | 12 | | 80 | 03 | 20 |
| उमरेड | 04 | 04 | | 100 | Nil | Nil |
| एकूण महिला वाहकाची संख्या | 63 | 57 | | 90.47 | 06 | 9.52 |

वरील तक्त्यामध्ये रामटेक आगारामध्ये 26 शासकीय महिला वाहकाची कार्यरत संख्या आहे. काटोल आगारांमधून 18 शासकीय महिला वाहक कार्यरत आहेत .सावनेर आगारामध्ये15 शासकीय महिला कार्यरत आहे. उमरेड आगारांमध्ये चार शासकीय महिला वाहक कार्यरत आहे. त्यांना प्रश्नावली द्वारे व मुलाखतीद्वारे प्राप्त वेतनाविषयी, कामाच्या तासाविषयी शारीरिक व मानसिक ताणविषयी, ध्वनी व वायू प्रदूषणाद्वारे होणारे शारीरिक आजार, प्रवाशाचे गैरवर्तन, सुरक्षितता विषयी प्रश्न विचारण्यात आले, त्यावरून खालील निष्कर्ष काढण्यात आले

## 6. निष्कर्ष

1) रामटेक आगारामधून 26 शासकीय महिलांच्या मुलाखती घेतल्या असून त्यापैकी 24 महिलांनी म्हणजेच 92.30% महिलांनी कामाचे तास जास्त असल्याविषयी, अपुरे वेतन, शारीरिक थकवा, मानसिक ताण,प्रवाशांची वाद, शारीरिक आजार, होत असल्याचे सांगितले.

2) काटोल आगारामधून 18 शासकीय कार्यरत महिला वाहकांची मुलाखत घेतली असून त्यापैकी 17 महिला वाहकांनी म्हणजेच 94.44% महिला वाहकांनी अपूरे वेतन, शारीरिक थकवा, अतिरिक्त कामाचे तास, मानसिक ताण आणि प्रवाशांचे बेशिस्त वर्तन बाबत सांगितले.
3) सावनेर आगारामधून15 महिला वाहक घेतले असून त्यापैकी 12 शासकीय महिला वाहकांनी म्हणजेच 80% शासकीय महिला वाहकांनी अनियमित वेतन, शारीरिक आजार, मानसिक ताण,अतिरिक्त कामाचे तास प्रवाशांशी वाद बाबत सांगितले.
4) उमरेड आगारामधून चार शासकीय महिला वाहक घेतल्या असून तेथील चारही शासकीय महिला वाहकाने म्हणजेच 100% महिला वाहकाने अतिरिक्त कामाचे तास, अपुरे वेतन, शारीरिक थकवा, मानसिक थकवा व मानसिक तणाव प्रवाशांशी वाद,ध्वनी व वायू प्रदूषणामुळे शारीरिक आजार होत असल्याचे सांगितले.
5) **आरोग्याच्या तक्रारी:-** रामटेक, काटोल, सावनेर, उमरेड आगारातील महिला वाहकांची एकूण संख्या 63 असून त्यापैकी 57 महिला वाहकाने म्हणजेच 90.47% महिला वाहकाने चालत्या बस मध्ये सतत उभे राहून काम करावे लागत असल्यामुळे पाय दुखणे, कंबर दुखी आणि शारीरिक थकवा या समस्यांनी ग्रस्त असल्याचे सांगितले.
6) **शारीरिक ताण:-** घर आणि काम यातील दुहेरी जबाबदारीमुळे 63महिला वाहकांपैकी 57 महिला वाहक म्हणजेच 90.47% महिला वाहक थकलेल्या अवस्थेत आणि तणावाखाली असतात.
7) **प्रवाशांचे वर्तन:-** शासकीय महिला वाहकांना अनेकदा मद्य धुंद प्रवासी किंवा गैरवर्तन करणाऱ्या प्रवाशांचा सामना करावा लागतो.
8) **सुरक्षितता:-** कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची कमतरता आणि रात्रीच्या शिफ्टमध्ये जरी टाळले जात असली तरी सुरक्षिततेबद्दलची भीती महिला वाहकांच्या मनात असते.

.

**7. उपाय योजना**

1) वेळेवर पगार:- एसटीच्या उत्पन्नात वाढ करून कर्मचाऱ्यांचे विशेषता महिला वाहकांचे पगार दर महिन्याच्या एक ते सात तारखेच्या आत व्हावेत.
2) प्रोत्साहन भत्ता:- शासकीय महिला वाहकांना ग्रामीण आणि घाट भागात काम करताना सुरक्षितता आणि अतिरिक्त कामासाठी विशेष प्रोत्साहन भत्ता जाहीर करावा.
3) सुरक्षित निवास व्यवस्था:- लांब पल्ल्याच्या मार्गावर काम करणाऱ्या महिला वाहकांसाठी डेपो किंवा बस स्थानकावर स्वच्छ आणि सुरक्षित विश्रामगृहे उपलब्ध करून देणे.
4) शौचालय आणि स्वच्छता सुविधा:- सर्व बस स्थानकावर महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छ शौचालयाची सोय सुनिश्चित करणे.
5) कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर:- कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तासान तास काम करणाऱ्या महिला वाहकांना अतिरिक्त ड्यूटीतून आराम मिळवून देणे व कामाच्या तासांचे योग्य नियोजन करणे.
6) जवळच्या मार्गावर प्राधान्य:- शक्य असेल तिथे महिला वाहकांना त्यांच्या घरापासून जवळच्या मार्गावर ड्युटी देण्यास प्राधान्य द्यावे.
7) आरोग्य तपासणी शिबिरे:- एसटी डेपो मध्ये विशेष आरोग्य तपासणी शिबिरे (उदा. महिलांचेआजार, मानसिक ताणतणाव ) आयोजित करणे.
8) सुरक्षितता प्रशिक्षण:- महिला वाहकांना आत्मसंरक्षण आणि आणीबाणीच्या प्रसंगी काय करावे याचे विशेष प्रशिक्षण देणे.

9) कौशल्य विकास: - एसटीच्या स्क्रॅपिंग प्रकल्पासारखा नवीन उपक्रमामध्ये महिला वाहकांना पर्यायी तांत्रिक कौशल्ये शिकवून सक्षम करणे.

10) पारदर्शक बदली प्रक्रिया:- बदलीसाठी सुस्पष्ट आणि पारदर्शक धोरण आखणे ज्यामुळे महिलांना त्रास होणार नाही.

## 8. संदर्भ ग्रंथ सूची


1. *Britannica. (2026, January 3). Nagpur: Location, history, economy, & facts. https://www.britannica.com/place/Nagpur-India*
2. *Directorate of Census Operations, Maharashtra. (2014). District census handbook: Nagpur (Series 28, Part XII-A). Census of India 2011. https://censusindia.gov.in/nada/index.php/catalog/study/DH_2011_2709_PART_A_DCHB_NAGPUR*
3. *District Nagpur, Government of Maharashtra. (2025, December 11). About district. https://nagpur.gov.in/about-district/*
4. *District Nagpur, Government of Maharashtra. (2025, December 22). Demography. https://nagpur.gov.in/demography/*
5. *District Nagpur, Government of Maharashtra. (2025, December 22). History. https://nagpur.gov.in/history/*
6. *Gazetteers Department, Government of Maharashtra. (n.d.). Nagpur district gazetteer: History – ancient period. https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/Nagpur/his1.html*